# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
**{ स.वि.वि. }** (DAY-NULM) मधील सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी या उपांगा अंतर्गत 2700 स्वयंसहायता समूहांची स्थापना करण्यात आली आहे. सदर स्वयंसहायता समूहांमध्ये 80 टक्के महिला शिवणकामात पारंगत आहेत. त्याचप्रमाणे समाज विकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील महिला, घटस्फोटीत, विधवा व गरजू महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावे याकरिता सन 2024-25 या आर्थिक वर्षात 335 महिलांना निःशुल्क स्वरूपात शिवणयंत्र वाटप करण्यात आले आहे.

समाज विकास विभाग अंतर्गत महिला व बालविकास या घटकाकरिता 5 टक्के राखीव निधीतून महिलांकरिता योजनांचा आराखडा तयार करण्याकरिता मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची सभा दिनांक 02/05/2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. आयुक्त यांनी कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे महिलांकरिता क्लस्टर तयार करून, क्लस्टर अंतर्गत कापडी पिशव्या किंवा इतर कापडांशी संबंधित वस्तू तयार करणाऱ्या कंपनी / मोठे व्यापारी / नागपूर शहरातील रूग्णालयाचे गणवेश / मनपा अंतर्गत सुरू असलेल्या शाळेतील मुलांचे गणवेश तयार करण्याचे कार्य उपलब्ध करून देण्याकरिता संलग्न करणे, करिता क्लस्टरच्या माध्यमातून महिलांना प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले आहे.

आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, 12, पीएमजी ले-आउट, नरेंद्र नगर, नागपूर यांच्या मार्फत महानगरपालिकेच्या 10 शाळेत Nutrition Gardens तसेच 14 शाळेत Environment Training सुरू करण्यात आले आहे. तसेच 15,000 वृक्षांना IIIT College at Waranga, नागपूर येथे देखभालचे कार्य, महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोती अभियाना (MSRLM) अंतर्गत Hirakani Mahila Stitching Cluster, Rangresha Cluster of Handcrafted Eco- Friendly Products, Wardhini Cluster of Mirco Enterprises of Women SHG, Aranyak Cluster of Handpounded Rice at Kurkheda, 4000 माता आणि मुले व 2000 महिला यांना यांचे आरोय तपासणी करून त्यांना कपडे प्रदान केले आहे, तसेच विविध क्षेत्रात कार्य केले आहे. विदर्भ क्षेत्रात मागील 20 वर्षात 25,000 महिलांना प्रशिक्षण व स्वयंरोजगार सुरू करण्यास मदत केली आहे. सद्यस्थितीत गांधीबाग झोन कार्यालयामागील हॉलमध्ये एचसीएल फाउंडेशन आणि आरोह संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने CSR फंडच्या आधारावर शिवणयंत्रांचे क्लस्टर सुरू करण्यात आले आहे. सदर क्लस्टर अंतर्गत 158 महिलांना शिवणकामाचे व्यवसायात प्रशिक्षण दिले आहे.

मा. आयुक्त यांनी दिनांक 20/01/2025 रोजी दिलेल्या मंजुरीन्वये WCL मार्फत प्राप्त होणाऱ्या CSR निधीतून आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर यांना सिताबर्डी येथील सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्र येथील पहिल्या मजल्यावरील तीन खोल्या उपलब्ध करून त्यांच्या सोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आले आहे. सदर संस्थेमार्फत सद्यस्थितीत प्रथम प्रशिक्षण वर्गाला (Batch) स्वयंसहायता समूहातील 30 महिलांना शिवणयंत्रचे प्रशिक्षण दिले असून, द्वितीय प्रशिक्षण वर्गाला प्रशिक्षण देण्याकरिता 30 महिलांची निवड करण्यात आली आहे. सदर क्लस्टर मधील महिलांना गणवेश शिवण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले व त्या आधारावर त्यांना नेताजी मार्केट हिंदी प्राथमिक शाळा, सिताबर्डी, नागपूर यांच्या मार्फत 76 गणवेश शिवण्याकरिता रू. 22,800/- चे कार्यादेश प्राप्त झाले. तसेच साकार फेअर ट्रेड इनकॉर्पोरेटेड, नागपूर यांच्या तर्फे 550 नॅपकीन शिवण्याकरिता रू. 1,100/- चे कार्यादेश प्राप्त झाले.

सदर प्रकल्प माहे जून-2025 च्या अखेरीस सुरू करावयाच्या उद्देशाने, तसेच वेळेची मर्यादा लक्षात घेता प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता ई-निविदेची अट शिथिल करून प्रथम टप्प्याकरिता लागणारे साहित्य विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उर्वरीत साहित्य टप्प्याटप्प्याने संस्थेच्या मागणीनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या मौका चौकशी अहवालानुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशान्वये कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे शिवणयंत्र क्लस्टर अंतर्गत पुढील तीन वर्षाकरिता स्वयंसहायता समूहातील 90 महिलांना, दरवर्षी 30 प्रमाणे प्रशिक्षण देण्याकरिता आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर या संस्थेचे उपरोक्त नमूद केलेले कार्य बघता व त्यांचा या क्षेत्रातील अनुभव बघता त्याचप्रमाणे स्वयंसहायता समूहातील महिलांना स्वयंरोजगार प्राप्त व्हावा या हेतूने, सदर संस्था ज्याप्रमाणे उत्तमरीत्या कार्य करीत आहे या बाबींना लक्षात घेऊन व मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यासोबत दिनांक 02/05/20225 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, प्रथम वर्षातील 11 महिन्याचे संस्थेमार्फत करण्यात आलेले कार्य व स्वयंसहायता समूहातील महिलांना प्राप्त झालेले स्वयंरोजगार याचा ताळमेळ लक्षात घेऊनच पुढील करार करण्यात येईल. तसेच शिवणयंत्र क्लस्टर करिता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अनु.क्र . | विवरण | रक्कम (.रू) |
|---|---|---|
| १ | उत्पादन आणि प्रशिक्षण केंद्र सेटअप | -/८,७८,३९० |
| २ | प्रशिक्षणाकरीता कार्यालयीन साहित्य खर्च | -/२,८७,८६७ |
| ३ | किरकोळ खर्च (स्टेशनरी, मशीनची दुरूस्ती देखभाल, व्यवस्थापन शुल्क व आवश्यकतेनुसार येणारा खर्च) | -/३,००,००० |
| ४ | कार्यक्रम आवर्ती खर्च - एक वर्षानंतर येणारा खर्च (Programme Recurring Cost) | -/७,२०,००० |
| | **एकूण** | **-/२१,८६,२५७** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिनियम प्रकरण पाच संविदा 2 (2) मधील तरतूदीन्वये, पुढील तीन वर्षाकरिता (प्रथम वर्षातील 11 महिन्याचे संस्थेमार्फत करण्यात आलेले कार्य व स्वयंसहायता समूहातील महिलांना प्राप्त झालेले स्वयंरोजगार याचा ताळमेळ लक्षात घेऊनच पुढील करार करण्यात येईल, या अटीवर) विनानिविदा कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे शिवणयंत्र क्लस्टर, आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर या संस्थेमार्फत कार्य करण्याकरिता रू. 21,86,257/- (अक्षरी – रूपये एकवीस लक्ष छ्यांशी हजार दोनशे सत्तावन फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन मान्यता प्रदान करण्यास्तव सादर प्रस्तुत.

**टिप** :- 1) सदर खर्च म.न.पा. अर्थसंकल्पात सन 2025-2026 अंदाजपत्रकातील पद क्र. A४७००२४७३८०३ मधून करण्यात येईल.

2) सविस्तर माहिती नस्ती सोबत संलग्न आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 187/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 28/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (सविवि), समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) मधील सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी या उपांगा अंतर्गत 2700 स्वयंसहायता समूहांची स्थापना करण्यात आली आहे. सदर स्वयंसहायता समूहांमध्ये 80 टक्के महिला शिवणकामात पारंगत आहेत. त्याचप्रमाणे समाज विकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील महिला, घटस्फोटीत, विधवा व गरजू महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावे याकरिता सन 2024-25 या आर्थिक वर्षात 335 महिलांना निःशुल्क स्वरूपात शिवणयंत्र वाटप करण्यात आले आहे.

समाज विकास विभाग अंतर्गत महिला व बालविकास या घटकाकरिता 5 टक्के राखीव निधीतून महिलांकरिता योजनांचा आराखडा तयार करण्याकरिता मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची सभा दिनांक 02/05/2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. आयुक्त यांनी कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे महिलांकरिता क्लस्टर तयार करून, क्लस्टर अंतर्गत कापडी पिशव्या किंवा इतर कापडांशी संबंधित वस्तू तयार करणाऱ्या कंपनी / मोठे व्यापारी / नागपूर शहरातील रूग्णालयाचे गणवेश / मनपा अंतर्गत सुरू असलेल्या शाळेतील मुलांचे गणवेश तयार करण्याचे कार्य उपलब्ध करून देण्याकरिता संलग्न करणे, करिता क्लस्टरच्या माध्यमातून महिलांना प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले आहे.

आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, 12, पीएमजी ले-आउट, नरेंद्र नगर, नागपूर यांच्या मार्फत महानगरपालिकेच्या 10 शाळेत Nutrition Gardens तसेच 14 शाळेत Environment Training सुरू करण्यात आले आहे. तसेच 15,000 वृक्षांना IIIT College at Waranga, नागपूर येथे देखभालचे कार्य, महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोती अभियाना (MSRLM) अंतर्गत Hirakani Mahila Stitching Cluster, Rangresha Cluster of Handcrafted Eco- Friendly Products, Wardhini Cluster of Mirco Enterprises of Women SHG, Aranyak Cluster of Handpounded Rice at Kurkheda, 4000 माता आणि मुले व 2000 महिला यांना यांचे आरोय तपासणी करून त्यांना कपडे प्रदान केले आहे, तसेच विविध क्षेत्रात कार्य केले आहे. विदर्भ क्षेत्रात मागील 20 वर्षात 25,000 महिलांना प्रशिक्षण व स्वयंरोजगार सुरू करण्यास मदत केली आहे. सद्यस्थितीत गांधीबाग झोन कार्यालयामागील हॉलमध्ये एचसीएल फाउंडेशन आणि आरोह संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने CSR फंडच्या आधारावर शिवणयंत्रांचे क्लस्टर सुरू करण्यात आले आहे. सदर क्लस्टर अंतर्गत 158 महिलांना शिवणकामाचे व्यवसायात प्रशिक्षण दिले आहे.

मा. आयुक्त यांनी दिनांक 20/01/2025 रोजी दिलेल्या मंजुरीन्वये WCL मार्फत प्राप्त होणाऱ्या CSR निधीतून आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर यांना सिताबर्डी येथील सोनचिरैया शहरी उपजीविका केंद्र येथील पहिल्या मजल्यावरील तीन खोल्या उपलब्ध करून त्यांच्या सोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आले आहे. सदर संस्थेमार्फत सद्यस्थितीत प्रथम प्रशिक्षण वर्गाला (Batch) स्वयंसहायता समूहातील 30 महिलांना शिवणयंत्रचे प्रशिक्षण दिले असून, द्वितीय प्रशिक्षण वर्गाला प्रशिक्षण देण्याकरिता 30 महिलांची निवड करण्यात आली आहे. सदर क्लस्टर मधील महिलांना गणवेश शिवण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले व त्या आधारावर त्यांना नेताजी मार्केट हिंदी प्राथमिक शाळा, सिताबर्डी, नागपूर यांच्या मार्फत 76 गणवेश शिवण्याकरिता रू. 22,800/- चे कार्यादेश प्राप्त झाले. तसेच साकार फेअर ट्रेड इनकॉर्पोरेटेड, नागपूर यांच्या तर्फे 550 नॅपकीन शिवण्याकरिता रू. 1,100/- चे कार्यादेश प्राप्त झाले.

सदर प्रकल्प माहे जून-2025 च्या अखेरीस सुरू करावयाच्या उद्देशाने, तसेच वेळेची मर्यादा लक्षात घेता प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता ई-निविदेची अट शिथिल करून प्रथम टप्प्याकरिता लागणारे साहित्य विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच उर्वरीत साहित्य टप्प्याटप्प्याने

संस्थेच्या मागणीनुसार विभागामार्फत करण्यात आलेल्या मौका चौकशी अहवालानुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशान्वये कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे शिवणयंत्र क्लस्टर अंतर्गत पुढील तीन वर्षाकरिता स्वयंसहायता समूहातील 90 महिलांना, दरवर्षी 30 प्रमाणे प्रशिक्षण देण्याकरिता आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर या संस्थेचे उपरोक्त नमूद केलेले कार्य बघता व त्यांचा या क्षेत्रातील अनुभव बघता त्याचप्रमाणे स्वयंसहायता समूहातील महिलांना स्वयंरोजगार प्राप्त व्हावा या हेतूने, सदर संस्था ज्याप्रमाणे उत्तमरीत्या कार्य करीत आहे या बाबींना लक्षात घेऊन व मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यासोबत दिनांक 02/05/20225 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, प्रथम वर्षातील 11 महिन्याचे संस्थेमार्फत करण्यात आलेले कार्य व स्वयंसहायता समूहातील महिलांना प्राप्त झालेले स्वयंरोजगार याचा ताळमेळ लक्षात घेऊनच पुढील करार करण्यात येईल. तसेच शिवणयंत्र क्लस्टर करिता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अनु.क्र . | विवरण | रक्कम (.रू) |
|---|---|---|
| १ | उत्पादन आणि प्रशिक्षण केंद्र सेटअप | -/८,७८,३९० |
| २ | प्रशिक्षणाकरीता कार्यालयीन साहित्य खर्च | -/२,८७,८६७ |
| ३ | किरकोळ खर्च (स्टेशनरी, मशीनची दुरूस्ती देखभाल, व्यवस्थापन शुल्क व आवश्यकतेनुसार येणारा खर्च) | -/३,००,००० |
| ४ | कार्यक्रम आवर्ती खर्च - एक वर्षानंतर येणारा खर्च (Programme Recurring Cost) | -/७,२०,००० |
| | **एकूण** | **-/२१,८६,२५७** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिनियम प्रकरण पाच संविदा 2 (2) मधील तरतूदीन्वये, पुढील तीन वर्षाकरिता (प्रथम वर्षातील 11 महिन्याचे संस्थेमार्फत करण्यात आलेले कार्य व स्वयंसहायता समूहातील महिलांना प्राप्त झालेले स्वयंरोजगार याचा ताळमेळ लक्षात घेऊनच पुढील करार करण्यात येईल, या अटीवर) विनानिविदा कौशल्य विकास केंद्र, पुनापूर, पारडी, नागपूर येथे शिवणयंत्र क्लस्टर, आरोह मल्टीपर्पोज सोसायटी, नागपूर या संस्थेमार्फत कार्य करण्याकरिता रू. 21,86,257/- (अक्षरी – रूपये एकवीस लक्ष छ्यांशी हजार दोनशे सत्तावन फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.